बीसी ५९९११०९

डीबीओडी क्र. एलईजी. बीसी. ५९/ ०९.०७.००५/२००९-१० नोव्हेंबर ९,२००९

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका

(आरआरबी सोडून)

महोदय,

**चेक्स फेटाळले जाणे -**
**वारंवार फेटाळले जाण्याच्या घटना हाताळणे**

कृपया आमचे ग्राहक सेवेवरील महापरिपत्रक डीबीओडी. क्र. एलईजी. बीसी. ९/०९.०७.००६/ २००९-१० दि. जुलै १, कोटी २००९ च्या परिच्छेद १५.४ चा संदर्भ घ्यावा. त्यात, रु १ कोटी व त्यापेक्षा अधिक घटना हाताताना विशिष्ट उपाय योजण्याबाबत बँकांना सल्ला देण्यात आला होता.

२) ह्या संदर्भात, येथे सागण्यात येते की, रु १ कोटी पेक्षा कमी रकमेचे चेक्स वारंवार फेटाळले जाणे ही सुद्धा काळजीची बाब असून चेक फेटाळले जात आहेत अशा खात्यांविरुद्ध बँकांनी योग्य ती कारवाई केली पाहिजे. छोट्या रकमांच्या चेक्स बाबत परिच्छेद १५.४ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व उपाय योजणे आवश्यक नसले तरी बँका अशा ग्राहकांबाबत स्वतः ठरवून उपाय योजू शकतात. ह्यासाठी बँकांना सांगण्यात येते की त्यांनी रु १ कोटी पेक्षा कमी रकमेचे चेक्स वारंवार फेटाळले जाण्याबाबत त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने एक धोरण तयार करावे. ह्या धोरणात, ईसीएस मँडेट वारंवार फेटाळले जाण्याबाबतच्या उपायांचा समावेश असावा.

आपला,

(बी महापात्रा)
मुख्य महाव्यवस्थापक